**नियमित फौ.खटला क्र. ३९१/२०२२**
**निशाणी क्र. १९**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**
**<u>सरतपास शपथेवर सुरु.</u>**

नाव : रूपेश पांडुरंग झोरे,
: वय – ३५ वर्षे, धंदा – दुध व्यवसाय
राहणार : पड्याळ वस्ती औंध रोड, पुणे

**<u>सरतपासणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. आर. इंगळे यांचेमार्फत</u>**

१. मी पड्याळ वस्ती येथे माझ्या कुटुंबासोबत राहतो. माझ्या कुटुंबात आई–वडिल, भाऊ, माझी पत्नी, भावाची पत्नी व मुले आहेत. माझ्या भावाच्या पत्नीचे नाव रेश्मा झोरे आहे. फिर्यादी हे माझे वडिल आहेत. आमचा दुध व्यवसाय आहे. आमच्याकडे सहा गाई आहेत. आमच्या घराच्या बाजुला गोठा आहे. अनिल गंगाराम झोरे हे घराशेजारी राहतात. दि. ०९/०४/२०२२ रोजी मी गाईंना चरायला घेवुन गेलो होतो. त्यांना घेवुन घरी परत येताना संध्यकाळी ५ ते ५.३० वाजता अनिल गंगाराम झोरे याच्या गोठ्याजवळुन जात असताना त्याच्या वैरणीचा ड्रम वाटेत होता. तो आमच्या गाईने पाडला. त्यानंतर अनिल झोरे तेथे आला व तो मला ड्रम उचलून ठैव असे रागात बोलू लागला. मी त्यांना बोललो की, तुम्ही रस्त्यात ड्रम ठेवता किती वेळा उचलणार, तुम्ही बाजुला ठेवा. हे ऐकुन त्याला राग आला व तो माझ्या अंगावर धावुन येवुन शिवीगाळ करायला लागला. तेव्हा तो घोडा लावेल अशा प्रकारच्या अश्लील शिवीगाळ मला करू लागला.(सदर साक्षीदार त्या शिवीगाळीचे शब्द बोलून दाखवू शकत नाही मी लिहून देवू शकतो असे बोलल्याने त्याने ते शब्द एका कागदावर लिहून दिले त्याप्रमाणे आजरोजी त्यांच्या साक्षीदरम्यान नोंदवत आहे.) [redacted]ा. आमच्या भांडणाच्या आवाजाने माझे वडिल तेथे आले. अनिल झोरेचा मुलगा विशाल झोरे तेथे आला व त्याने लोखंडी रॉड माझ्या डोक्यात मारला. माझे वडिल सोडवासोडव करण्याकरिता आले असता त्यांच्या डोक्यात देखील विशाल झोरे

याने मारले. तेथे इतर माणसे जमा झाली. माझी वहिणी रेश्मा झोरे या देखील तेथे आल्या. आम्हाला मारहाण होताना पाहिल्याने तिने विशाल झोरेच्या हातातील लोखंडी रॉड ओढला. त्यामुळे राग येवुन विशाल झोरेने खाली पडलेला लाकडी बांबू माझ्या वहिणीच्या डाव्या हातावर मारला. त्यामुळे तिच्या हातातील बांगडी फुटुन त्याची काच तिच्या हातात घुसली. म्हणुन माझे वडिल पुन्हा सोडवायला मध्ये पडले असता विशाल झोरे याने माझ्या वडिलांच्या हातावर व पाठीवर लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यानंतर माझा भाउ मंगेश झोरे तेथे आल्यावर अनिल झोरे व विशाल झोरे तेथुन पळुन गेले. आम्हाला मारहाण झाल्याने रक्त येवु लागले होते. माझ्या भावाने आम्हाला रिक्शात बसवुन खडकी पोलिस स्टेशनला नेले. पोलिसांनी आमच्याकडे चौकशी करून ससुन रूग्णालयाची पावती दिली. तेथे रूग्णालयात आमच्यावर उपचार करण्यात आला. माझ्या डोक्यात चार टाके व वडिलांच्या डोक्यात तीन टाके पडले. तेथे उपचार घेवुन आम्ही पुन्हा खडकी पोलिस स्टेशन येथे गेलो व वडिलांनी तक्रार नोंदवली. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली. ज्या लाकडी दांडके व लोखंडी रॉडने मला माझ्या वडिलांना व वहिनिंना मारहाण झाली ते मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी मला आर्टीकल अ वरील लोखंडी रॉड व आर्टीकल ब वरील लाकडी दांडका दाखवण्यात आला. ते तेच आहेत. आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी विशाल झोरे हजर आहे व अनिल झोरे गैरहजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री. एस. डी. जपे वकील यांचेमार्फत सुरु –</u>**

२.  हे खरे आहे की, पड्याळवस्ती दाट लोकवस्तीचा भाग आहे. सदरचा भाग झोपडपट्टीचा आहे. हे खरे आहे की, वडिलांनी फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी मला आजपर्यंत कधीही बोलावले नाही. हे खरे आहे की मी, वडिल व वहिणी रूग्णालयात दाखल नव्हतो. हे खरे आहे की, मी गाई चरूण ज्या वेळेस आलो त्यावेळेस वडिल तेथे नव्हते, परंतु घरात होते. आम्हाला झालेल्या जखमांबाबत आम्ही डॉक्टरांना सांगितले. हे खरे आहे की, माझ्या जबाबामध्ये काय शिवीगाळ केली असे नमुद नाही.

पोलिसांनी आम्हाला विचारले नाही. आर्टीकल ब वर लाकडी बांबू आहे. हे खरे आहे की, लाकडी दांडका भरीव असतो. आम्ही पोलिसांना लाकडी बांबू सांगितला आहे. हे खरे आहे की, पोलिसांनी लाकडी बांबू व लोखंडी रॉड कोठून जप्त केला याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नव्हती. हे खरे आहे की, आमचा जाण्या येण्याचा रस्ता आरोपीच्या घरासमोरून जातो. हे खरे नाही की, या रस्त्यामध्ये महानगरपालिकेचे ड्रेनेज पाईप आहेत. ते अंडरग्राउंड आहेत. हे खरे आहे की, पड्याळवस्तीमध्ये सगळे ड्रेनेज अंडर ग्राउंड आहेत. हे खरे नाही की, मी झटापटीमध्ये खाली पडलो. हे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नाही व मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

PRAJKTA SHIRISH APTE
Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2026.03.06 17:30:22 +0530

(पी. एस. आपटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र–२) खडकी, पुणे.

दिनांक – ०६/०३/२०२६